सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५३ | सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१७ नोव्हेंबर

- पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (NCL) सेन्द्रिय रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. के. एन. गणेश यांची अहमदाबादच्या नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेसचे फेलो म्हणून निवड.
- देवरुख येथील मातृमंदिर संस्थेच्या संस्थापिका इंदिराबाई हळबे यांची जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड.
- महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेचे अध्यक्ष हरी नरके यांना दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीची फेलोशिप जाहीर.
- तिसऱ्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## मोफत मोतिबिंदू तपासणी शिबीर...!





(छायाचित्रे : नितेश बारी)

# मोटारसायकल चोरी प्रकरणातील आरोपींचे धावडे येथून पलायन

## गरम चहाने पोलिसांचे तोंड पोळले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील दोन संशयित आरोपींना न्यायालयीन कोठडी मिळाली होती. जळगाव कारागृहामध्ये जागा नसल्याने या आरोपींची नंदुरबार कारागृहात रवानगी होणार होती. त्यांना घेऊन जाताना दोंडाईचा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धावडे गावाजवळ चहा- पाण्यासाठी पोलीस थांबले होते. यावेळी आरोपींनी संधी साधली. पोलिसांच्या हातावर तुरी देऊन त्यांनी पलायन केले. ही घटना शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी दुपारी अडीचच्या सुमारास घडली. पोलिसांना चहाची तल्लफ चांगलीच अडचणीची ठरली आहे. जणू या चहामुळे त्यांचे तोंडच पोळले आहे.



अमळनेरसह परिसरातील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात शाहदा तालुक्यातील सातपिंपरी येथील अंबालाल भूरट्या खरडे व हिम्मत उर्फ रेहज्या पावरा या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडून २४ मोटरसायकल जप्त करण्यात आल्या होत्या. त्यांची पोलीस कोठडी संपल्यानंतर पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. कधी दारू आणि नॉनव्हेजची लालसा तर कधी बिडी-सिगारेट, चहाची तल्लफ यामुळे अनेकदा गुन्हेगार पोलीसांच्या तावडीतून पळून जातात. अशा घटना वारंवार घडूनही पोलीस त्यातून फारसा बोध घेत नसल्याचेच या घटनेवरून पुन्हा लक्षात येते.

या घटनेमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती वरिष्ठांना कळविण्यात आली. दोंडाईचा, धुळे, नंदुरबार व अमळनेर येथील पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नाकाबंदी केली. आरोपींचा शोध घेतला. मात्र, ते अद्यापही सापडलेले नाहीत.

# मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर

## ११७ रुग्णांनी घेतला लाभ; ७२ रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री मंगळग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील ११७ रुग्णांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ७२ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. त्यांना सोमवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मंगळग्रह मंदिर येथून पनवेल येथील आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल येथे पुढील उपचारासाठी रवाना करण्यात येईल. डॉ. राहुल चौधरी व डॉ. गौरव तायडे (नेत्ररोग तज्ज्ञ, शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल) यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिराचे मुख्य संयोजक भूपेंद्र वाघ, प्रशांत कोळी यांचे विशेष सहकार्य लाभले. मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम यांनी सूत्रसंचालन केले. खजिनदार गिरीश कुळकर्णी यांनी आभार मानले. जनसंपर्क अधिकारी रजनीकांत पाटील, भूषण पाटील, नितेश बारी, प्रमोद, पाटील संजय सोनवणे यांनी सहकार्य केले.

# वीज बिलावरील नाव बदलण्यासाठी ऑनलाईन प्रणाली लागू

## ग्राहकांमध्ये समाधान; सात दिवसांच्या आत होणार प्रक्रिया पूर्ण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

**अमळनेर :** महावितरण कंपनीने वीज बिलावरील नाव बदलण्याची प्रक्रिया आता अधिक सोपी केली आहे. पूर्वी एक महिना लागत होता. मात्र, आता या ऑनलाईन प्रणालीमुळे सात दिवसाच्या आत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्र्यांच्या सूचनेनुसार ही नवीन प्रणाली लागू करण्यात आली आहे. यामुळे ग्राहकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. मालमत्ता खरेदी, वारसा हक्क किंवा आदी कारणांमुळे घराची मालकी बदलते. परिणामी वीज ग्राहकांना वीज बिलावरील नावही बदलावे लागते. यासाठी पूर्वी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमांनुसार अर्ज तपासणी, मंजुरीसाठी एक महिन्याचा कालावधी निश्चित होता. मात्र, आता नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे ही प्रक्रिया आता अवघ्या एका आठवड्यात पूर्ण होणार आहे. वीज बिलावरील ग्राहकांची नावे बदलण्याची प्रक्रिया स्वयंचलित झाली आहे. यासाठी ग्राहक महावितरणच्या मोबाइल ॲपवर किंवा वेबसाइटवर लॉग इन करुन ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. नवीन विकसित व कार्यान्वित करण्यात आलेल्या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्जांना स्वयंचलित मंजुरी मिळत आहे. ज्यामुळे वेळ वाचेल आणि काम जलद होईल.

> ग्राहकांनी वीज बिलावरील नावात बदल करण्यासाठी महावितरणच्या पोर्टवर ऑनलाईन अर्ज करावा. अर्जामध्ये खरेदी-विक्रीचे मूळ कागदपत्रे अपलोड करावीत. कागदपत्रे सादर करताना मोबाईल क्रमांक नमूद करावा. या सुविधेमुळे ग्राहकांचा वेळ वाचणार आहे. ही प्रक्रिया अधिक पारदर्शक झाली आहे. योजनेच्या ग्राहकांनी लाभ घ्यावा.
> **– तुकाराम नेमाडे,** अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अमळनेर.

### एसएमएसद्वारे तत्काळ माहिती

अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करून प्रक्रिया शुल्क भरावे लागेल. त्यानंतर संबंधित उपविभागीय कार्यालयात अर्जाची पडताळणी होईल. अर्जात काही त्रुटी आढळल्यास ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे त्वरित माहिती दिली जाईल. नाव बदलण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही ग्राहकांना एसएमएसद्वारे माहिती मिळणार आहे.

### कसा व कुठे करायचा अर्ज ?

महावितरणच्या मोबाइल ॲप किंवा संकेतस्थळावर अर्ज करण्याची सोय उपलब्ध आहे. ग्राहकांना 'लॉग ईन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करावा लागेल. आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि प्रक्रिया शुल्क भरण्याची सुविधाही ऑनलाइन उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## श्री मंगळग्रह देवतेचे दर्शन...!



**महान भारतीय क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नातू अमित आझाद यांनी धर्मपत्नी सौ. नेहा आझाद यांच्यासमवेत शनिवारी अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरास भेट दिली. याप्रसंगी पूजा-विधी करून श्री मंगळग्रह देवतेचे श्रद्धाभावनेने दर्शन घेताना आझाद दाम्पत्य.**
**(छायाचित्र : नितेश बारी)**

# कोपरगावचा नरभक्षक बिबट्या ठार

## 'तोच' नरभक्षकच का? वनविभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोपरगाव परिसरात धुमाकूळ घालून तीन वर्षीय बालिकेसह वृद्धेचा बळी घेणाऱ्या नरभक्षक बिबट्याचा अखेर वध करण्यात आला आहे. यासाठी शनिवार, दि. १५ रोजी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास टाकळी शिवारात पुणे येथून दोन शुटर बोलाविले होते. त्यांनी गोळ्या झाडून या बिबट्याला ठार केले आहे. मात्र, वनविभागाने ज्या बिबट्याला ठार केल्याचा दावा केला आहे, तोच नरभक्षक बिबट्या आहे का, याबाबत स्थानिक नागरिक व अधिकाऱ्यांमध्ये साशंकता आहे. यामुळे वनविभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून तालुक्यात विविध ठिकाणी बिबट्यांचा वावर सुरू आहे. नरभक्षक बिबट्याला त्वरित ठार करावे, अशी मागणी माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे यांनी केली होती. बुधवार,

पान ३ वर

# अमळनेरला सातव्या दिवशी उमेदवारी अर्जांचा पाऊस

## नगरसेवकपदासाठी २२५, नगराध्यक्षपदासाठी ८ अर्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिकेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सातव्या दिवशी नगरसेवक पदासाठी १०७, तर नगराध्यक्षपदासाठी ३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारांनी अर्ज दाखल करताना शहरात रॅली काढून शक्तीप्रदर्शन केले. रविवार, दि. १६ नोव्हेंबरपर्यंत नगरसेवक पदासाठी २२५, तर नगराध्यक्षपदासाठी ८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

शनिवार, दि. १५ नोव्हेंबरपर्यंत नगरसेवक पदासाठी ११८, तर नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. आज यात ११० अर्जांची भर पडली आहे. उमेदवारी अर्जांची संख्या दोनशेच्या वर पोहोचली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवारांसह त्यांचे समर्थक, कार्यकर्त्यांची पालिकेबाहेर मोठी गर्दी झाली होती. उमेदवारांच्या समर्थनार्थ विविध घोषणांनी पालिका परिसर दुमदुमला होता. अनेक उमेदवारांनी आघाडी व पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. मात्र, नेत्यांनी अद्याप पक्षाकडून व आघाडीकडून उमेदवारांची यादी जाहीर केलेली नाही. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने शनिवार व रविवार सुटीचे दिवस असतानाही उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मान्यता दिली होती. याचा इच्छुक उमेदवारांनी लाभ घेतल्याचे दिसून आले आहे.

### उमेदवारी अर्जांसाठी आज अंतीम मुदत

पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार, दि. १७ नोव्हेंबर अंतीम मुदत आहे. यामुळे सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पालिकेत झुंबड उडणार आहे. यंदाच्या निवडणुकीत ऑनलाईन उमेदवारी अर्ज भरण्याचीही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, उमेदवारांना यासाठी तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष (ऑफलाईन) उमेदवारी अर्ज दाखल करण्यावर उमेदवारांनी भर दिला आहे.

# महाराष्ट्रातील ' हे ' शहर ठरले आशियातील सर्वांत आनंदी शहर!

## नवीन सर्वेक्षणात बीजिंग, शांघाय आणि हाँगकाँगही पडले मागे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगभरात अशी अनेक शहरे आहेत, की जी एका किंवा दुसऱ्या बाबतीत उत्कृष्ट मानली जातात. काही स्वच्छतेत तर काही शिक्षणात उत्कृष्ट आहेत. मात्र नुकतेच एक नवीन सर्वेक्षण प्रसिद्ध झाले आहे. त्यानुसार २०२५ या वर्षासाठी आशियातील सर्वांत आनंदी शहरांची यादी प्रसिद्ध झाली आहे.

या वार्षिक सर्वेक्षणात प्रमुख शहरांमधील १८ हजारांहून अधिक रहिवाशांचे मूल्यांकन या सर्वेक्षणात करण्यात आले आहे. त्यांना त्यांच्या शहराच्या जीवनशैलीबद्दल आणि तेथील लोकांबद्दल कसे वाटते हे विचारण्यात आले. या नवीनतम सर्वेक्षणात आशियातील सर्वांत आनंदी शहर कोणते याचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

हे नवीनतम सर्वेक्षण टाईम प्रसिद्ध केले असून सहभागींनी संस्कृती, अन्न, नाईटलाईफ आणि राहणीमानाच्या गुणवत्तेसह विविध घटकांच्या आधारे त्यांच्या शहरांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. हे जाणून नक्कीच आश्चर्य वाटेल, की या यादीत परदेशी शहर नाही तर महाराष्ट्रातील शहराने बाजी मारली आहे.

हो, ते अगदी बरोबर आहे. या यादीतील पहिल्या क्रमांकाचे शहर भारतातील एक महानगर आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई २०२५ च्या सर्वांत आनंदी शहरांच्या यादीत प्रथम क्रमांकावर आहे. ९४ टक्के मुंबईकरांचा असा विश्वास आहे, की त्यांचे शहर त्यांना आनंद देते. त्यामुळे ते यावर्षी आशियातील सर्वांत आनंदी शहर ठरले आहे.

सर्वेक्षणानुसार ८९ टक्के मुंबईकरांना त्यांच्या आयुष्यात इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा येथे जास्त आनंद मिळतो. दरम्यान, ८८ टक्के लोकांचा असा विश्वास आहे, की शहरातील रहिवासी अधिक आनंदी पाहायला मिळतात. ८७ टक्के लोक म्हणतात, की अलीकडच्या काळात त्यांच्या आनंदाची भावना वाढली आहे. या यादीत बीजिंग आणि शान आहे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. अनुक्रमे ९३ टक्के आणि ९२ टक्के लोक आनंदी आहेत. ही दोन्ही महानगरे सुरक्षितता, सुविधा, परवडणारी क्षमता आणि संस्कृतीमध्ये उच्च स्थानावर आहेत. जनरेशन झेड च्या भविष्यासह ते दोलायमान मानले गेले आहेत.

थायलंडमधील चियांग माई आणि हनोई हे शहर पहिल्या पाच शहरांमध्ये या यादीत आहेत. दोन्ही शहरांमध्ये ८८ टक्के लोक म्हणतात, की त्यांचे शहर त्यांना आनंद देतात. हनोईने दैनंदिन आनंदात थोडेसे मागे टाकले आहे. दोन्ही शहरे त्यांच्या हिरव्यागार जागा, आरामदायी गती आणि खोल सामुदायिक बंधासाठी प्रसिद्ध आहेत. तर सोल, सिंगापूर आणि टोकियो हे खालच्या क्रमांकावर आहेत.



टोकियो मधील फक्त ७० टक्के रहिवाशांनी म्हटले आहे, की हे शहर त्यांना आनंदी देते. जास्त कामाचे तास आणि वेगवान जीवनशैली थकवणारी आहेत. ज्यामुळे तणावमुक्तीसाठी उद्याने, स्नानगृहे आणि निसर्ग सहली किती महत्त्वाच्या आहेत हे अधोरेखित करण्यात आले आहेत.



# १८८० पासूनचे सातबारा उतारे आता मोबाईलवर एका क्लिकवर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या डिजिटल युगात सरकारने शेतकरी आणि नागरिकांसाठी एक महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यात आता जमिनीचा सातबारा उतारा पाहण्यासाठी किंवा डाऊनलोड करण्यासाठी तलाठी कार्यालयात खेटे घालण्याची गरज नाही. तुम्ही घरबसल्या तुमच्या मोबाईलवरून काही मिनिटांत ही माहिती मिळवू शकता. ही सुविधा शेतकऱ्यांचा वेळ आणि मेहनत वाचविते. तसेच जमिनीच्या व्यवहारात पारदर्शकता आणते.

## सातबारा उतारा म्हणजे काय?

सातबारा उतारा हे जमिनीच्या मालकी आणि वापराबाबत माहिती देणारे महत्त्वाचे कागदपत्र आहे. यात दोन मुख्य भाग असतात.

– फॉर्म ७ : यात जमिनीच्या मालकाचे नाव, खाते क्रमांक, गट/सर्व्हे क्रमांक आणि जमिनीची मालकी यांचा तपशील असतो.

– फॉर्म १२ : यात जमिनीवर घेतलेली पिके, शेतीखालील क्षेत्रफळ आणि इतर कृषी तपशील नमूद असतात.

हे दोन्ही फॉर्म एकत्रितपणे सातबारा उतारा तयार करतात. हा दस्तऐवज बँकेत कर्ज घेण्यासाठी, जमीन विक्री-खरेदीसाठी, विमा हक्क मिळविण्यासाठी किंवा कोर्टात पुरावा म्हणून अत्यंत महत्त्वाचा आहे.

## मोबाईलवर ७/१२ कसा पाहावा?

महाराष्ट्र सरकारच्या महाभूलेख पोर्टलद्वारे सातबारा उतारा ऑनलाइन पाहणे आणि डाऊनलोड करणे सोपे आहे. त्यासाठी खालील पायऱ्या फॉलो करणे आवश्यक आहे.

**१) महाभूलेख पोर्टलवर जा.**

– तुमच्या मोबाईल किंवा संगणकाच्या ब्राउझरमध्ये bhulekh.mahabhumi.gov.in हे संकेतस्थळ उघडा.

– गुगलवर Mahabhulekh किंवा महाभूलेख, असा शोध घेऊन अधिकृत संकेतस्थळ निवडा.

**२) जिल्हा, तालुका आणि गाव निवडा.**

– मुख्य पृष्ठावर तुमचा जिल्हा, तालुका आणि गाव निवडा.

**३) शोध पर्याय निवडा.**

– तुम्ही खालील तीन पर्यायांपैकी एक वापरा.

– सर्व्हे क्रमांक/गट क्रमांक

– खातेदाराचे नाव

– खाते क्रमांक

– तुमच्या सातबारा उताऱ्यावरील माहितीच्या आधारे योग्य पर्याय निवडा आणि तपशील टाका.

**४) कॅप्चा कोड टाका.**

– काही वेळा सुरक्षेसाठी कॅप्चा कोड टाकावा लागतो. तो काळजीपूर्वक भरून ' शोधा ' (Search)वर क्लिक करा.

**५) उतारा पाहणे आणि डाऊनलोड करणे.**

– तुमच्या स्क्रीनवर सातबारा उतारा दिसेल. माहिती बरोबर आहे याची खात्री करा.

– उतारा PDF स्वरूपात डाऊनलोड करण्यासाठी ' डाऊनलोड ' (Download) किंवा ' प्रिंट ' पर्यायावर क्लिक करावे.

– तुम्ही हा उतारा मोबाईल किंवा संगणकात सेव्ह करू शकता किंवा प्रिंट घेऊ शकता.

**महाभूलेख पोर्टलचे फायदे**

**– सुलभता :** घरबसल्या, कधीही सातबारा उतारा पाहता आणि डाऊनलोड करता येतो.

**– वेळेची बचत :** तलाठी कार्यालयात रांगेत उभे राहण्याची गरज नाही. काही मिनिटांत माहिती मिळते.

**– पारदर्शकता :** डिजिटल उतारे अपडेटेड असतात. त्यामुळे चुकीची माहिती मिळण्याची शक्यता कमी आहे.

**– कायदेशीर कामांसाठी उपयुक्त :** बँक कर्ज, जमीन व्यवहार, विमा किंवा कोर्टातील पुराव्यासाठी उतारा तातडीने उपलब्ध होतो.

**– फसवणुकीला आळा :** डिजिटल माहितीमुळे जमिनीच्या मालकीबाबत गैरसमज किंवा फसवणूक टाळली जाते.

**सावधगिरी आणि टिप्स**

**– माहिती तपासा :** सातबारा उताऱ्यावरील सर्व्हे क्रमांक, खाते क्रमांक आणि गावाचे नाव बरोबर टाकण्याची खात्री करा.



**– इंटरनेट कनेक्शन :** पोर्टल वापरताना स्थिर इंटरनेट कनेक्शन असावे.

**– डाउनलोडची खात्री:** डाउनलोड केलेला उतारा तपासा आणि आवश्यकतेनुसार त्याची प्रिंट काढा.

**– अधिकृत पोर्टल:** फक्त bhulekh.mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करा, बनावट वेबसाइट्सपासून सावध रहा.

महाभूलेख पोर्टलमुळे 1880 पासूनचे जुने सातबारा उतारे आता एका क्लिकवर उपलब्ध झाले आहेत. ही डिजिटल सुविधा शेतकऱ्यांचा वेळ आणि मेहनत वाचवते, तसेच जमिनीच्या व्यवहारात पारदर्शकता आणि विश्वासार्हता आणते. बँक कर्ज, जमीन विक्री-खरेदी किंवा कायदेशीर कामांसाठी लागणारी कागदपत्रे आता सहज मिळतात. सरकारच्या या डिजिटल पाऊलाने शेतकऱ्यांचे जीवन सोपे झाले आहे, आणि हा खऱ्या अर्थाने डिजिटल महाराष्ट्राकडे जाणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

# ऐश्वर्या रायचा ' जोधा अकबर 'मधील भव्य थाट :
# २०० किलो सोन्याचे दागिने आणि ५० बॉडीगार्ड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

२००८ मध्ये प्रदर्शित झालेला ' जोधा अकबर ' हा बॉलीवूडमधील सर्वांत वैभवशाली ऐतिहासिक चित्रपटांपैकी एक आहे. हृतिक रोशन आणि ऐश्वर्या राय बच्चन यांच्या अप्रतिम केमिस्ट्रीने प्रेक्षकांची मने जिंकली. मुघल सम्राट अकबर आणि राजपूत राजकन्या जोधा यांच्या प्रेमकथेवर आधारित या चित्रपटात ऐश्वर्याने महाराणी जोधाबाईंची भूमिका साकारली होती. तिच्या शाही लूक आणि खऱ्या सोन्याच्या दागिन्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

## २०० किलो सोन्याचे दागिने

चित्रपटाला वास्तववादी स्वरूप देण्यासाठी निर्मात्यांनी बनावट किंवा इमिटेशन दागिन्यांचा वापर टाळला. ऐश्वर्याने घातलेल्या दागिन्यांचे एकूण वजन सुमारे २०० किलो होते. या दागिन्यांमध्ये सोन्यासह मौल्यवान मोती आणि रत्ने जडविण्यात आली होती. ज्यांची किंमत कोट्यवधी रुपये होती. हे दागिने बनविण्यासाठी २०० कारागिरांनी दोन वर्षे मेहनत घेतली. ऐश्वर्याने एका मुलाखतीत सांगितले, की इतके जड दागिने घालणे तिच्यासाठी आव्हानात्मक होते आणि शूटिंगसाठी तयार होण्यास तिला दोन तास लागायचे.

## ५० सुरक्षारक्षकांचा पहारा

या मौल्यवान दागिन्यांच्या सुरक्षेसाठी चित्रपटाच्या सेटवर २४ तास ५० सुरक्षारक्षक तैनात होते. जेणेकरून चोरी किंवा नुकसान टाळता येईल. प्रसिद्ध डिझायनर नीता लुल्ला यांनी डिझाईन केलेले ऐश्वर्याचे शाही पोशाख आणि दागिने राजस्थानच्या राजवाड्यांची आठवण करून देतात. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर या दागिन्यांचे डिझाइन इतके लोकप्रिय झाले, की बाजारात अशाच प्रकारचे दागिने लग्न आणि खास प्रसंगांसाठी ट्रेंड बनले. आजही ' जोधा अकबर 'च्या दागिन्यांना मोठी मागणी आहे.

## चित्रपटाचे इतर वैशिष्ट्य

' जोधा अकबर ' केवळ कथानक आणि भव्य सेट्समुळेच नव्हे, तर ए. आर. रहमान यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतामुळे आणि जावेद अख्तर यांच्या ' ख्वाजा मेरे ख्वाजा ' आणि ' जशन-ए-बहरा 'सारख्या गीतांमुळेही लोकप्रिय आहे. या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात एक खास स्थान निर्माण केले आहे.



# एसी मैकेनिक के बेटे ने टॉप आयआयएम से किया एमबीए



**सक्सेस स्टोरी**

सपने देखना आसान है, लेकिन उन्हें पूरा करना कठिन। आर्थिक तंगी में भी अगर इरादे मजबूत हों, तो मंजिल मिल ही जाती है।

अहमदाबाद के पालडी, कोचरब में रहने वाले रजिन मंसूरी (२४ वर्ष) ने यही साबित किया। उनके पिता घर-घर जाकर एसी रिपेयर करते हैं और महीने के २५ हजार रुपये से पूरा परिवार (मां, पिता, छोटा भाई) एक बेडरूम वाले घर में गुजारा करता है। रजिन ने इसी संघर्ष के बीच सेल्फ-स्टडी से सीएटी परीक्षा दो बार क्रैक की, आयआयएम कोलकाता से एमबीए किया और अब दिल्ली की मल्टीनेशनल कंपनी में नौकरी कर रहे हैं।

**शिक्षा बनी हथियार**

रजिन के लिए शिक्षा ही आर्थिक मुश्किलों का एकमात्र हथियार थी। अहमदाबाद यूनिवर्सिटी से बीटेक करने के बाद, २०२१ में सीएटी में ९६.२ पर्सेंटाइल स्कोर किया, जिससे आयआयएम उदयपुर मिला। लेकिन संतुष्ट न होने पर २०२२ में फिर परीक्षा दी। इस बार ९९.७८ पर्सेंटाइल के साथ आयआयएम बैंगलोर और कोलकाता से ऑफर मिला। उन्होंने आयआयएम कोलकाता चुना, जहां फीस २७ लाख रुपये थी। संस्थान से पार्शियल स्कॉलरशिप और बाकी लोन से पढ़ाई पूरी की।

**आयआयएम में नई शुरुआत**

आयआयएम कोलकाता में रजिन ने कोर्सवर्क के अलावा प्रैक्टिकल एक्टिविटीज पर फोकस किया। प्लेसमेंट टीम में काम किया, साथियों से सीखा। "प्रोफेसरों जितना साथियों से सीखा। अद्भुत लोगों से मिला और अवसर खोजे," कहते हैं रजिन। उनकी कहानी वायरल हुई, तो उम्मीदवारों और पिता के क्लाइंट्स ने सलाह मांगी। कई दोस्तियां आज भी बरकरार हैं। माता-पिता को आयआयएम एडमिशन पर यकीन ही नहीं हुआ।

रजिन कहते हैं, "शिक्षा से संघर्ष जीता। अब भाई को प्रेरित कर रहा हूं।" उनकी यात्रा हर स्टूडेंट के लिए मोटिवेशन है : मेहनत और अनुशासन से कुछ भी संभव।

# आरोग्य टिप्स



१) अंघोळ करताना तोंडात पाणी घेऊन अंघोळ करणे. सर्दी, खोकला, ताप येत नाही.

२) पाय उत्तरेस व डोके दक्षिणेला करून झोपले तर लकवा (पॅरालीसीस) येत नाही.

३) रोज एक आंब्याचे पान खाल्ले तर मुखदुर्गंधी निघून जाते व अपचन होत नाही.

४) रोज एक ग्लास ताक प्यायले तर हार्ट अटॅक येत नाही.

५) स्मरणशक्ती साठी रोज एक पेरू सलग १५ दिवस खाणे, मुलांना देणे.

६) वर्षातून एकदा सलग १५ दिवस गाजराचा रस घेतला तर कॅन्सर होत नाही.

७) रोज ४ सीताफळाची पाने खाणे आणि ३ किलोमीटर चालणे. पहिले १ कि.मी. रेग्यूलर चालणे, हात पुढे व मागे. पोटावरची चरबी निघून जाते. दुसरे १ कि.मी. कॅटवॉक सारखे चालणे, एक रेषेत पाय पडले पाहिजेत, आतड्याला पीळ पडला पाहिजे. अपचनाचा त्रास होत नाही, पोटावरची चरबी निघून जाते, स्वादुपिंड काम करू लागते, शुगरचा त्रास होत नाही. तिसरे १ कि.मी. आर्मी परेड सारखे चालणे.

८) रोज एक चमचा पांढरे तीळ खाल्ल्यास हाडे मजबूत होतात.

९) ऐकू न येणे- चमचाभर कांद्याचा रस काढणे, एक थेंब मध टाकणे, कोमट पाण्यात घेऊन वस्त्रगाळ करणे व कानात टाकणे, कानात कापूस टाकणे. ३ दिवस करणे किंवा ६ ते ७ दिवस करणे. १५ दिवस करणे.

१०) शरीरशुद्धी साठी वर्षातून एकदा सलग ३ दिवस काही न खाता पिता फक्त ताजे ताक पिणे. रात्री झोपताना थोडेसे पाणी चालेल. पहिल्या दिवशी काही होत नाही, सायंकाळी थकवा जाणवायला लागतो, लूझ मोशन सारखे होते. दुसऱ्या दिवशी पण त्रास होतो. तिसऱ्या दिवशी पूर्णपणे झोपून राहायला लागते. चौथ्या दिवसापासून आठ दिवसांपर्यंत वरण-भात खाणे. हिरवी मिरची आठ दिवस खाऊ नये.

११) जुलाबसाठी- चमचाभर मेथीचे दाणे अर्धा ग्लासात कोमट पाण्यात गिळणे.

१२) नाकाचे हाड वाढणे- ५ रिटा ३ कप पाण्यात टाकून १ चमचा सुंठ पावडर टाकणे. आटवून एक कप करणे, वस्त्रगाळ करणे. काचेच्या बाटलीत ठेवून, रोज रात्री झोपताना २-२ थेंब नाकात ८ दिवस घालणे.

१३) मूळव्याधसाठी- अर्धा लिंबू व त्याच्यात सैंधव मीठ ४ ते ५ चमचे टाकणे व लोणचे चाखल्या सारखे चाखणे. १० मिनिटांत थांबते. वर्षातून ७ दिवस सकाळ सायंकाळ करणे. पोटही सुटणार नाही.

१४) वर्षातून फक्त एकदा शुद्ध संजीवनी १५ दिवस पिणे (२५० मि.ली.) किंमत रुपये १,२६०/-. फक्त फुलांचा व फळांचा रस आहे. सरबतासारखे आहे. पथ्य काही नाही. कितीही काम केले तरी थकवा येत नाही. कंबरदुखी, गुडघेदुखी, बी.पी.चा त्रास निघून जाईल. उष्णतेचा, मूळव्याधचा, केस गळतीचा त्रास निघून जातो.

१५) ५ ते ६ चमचे दूध घेऊन त्यात लिंबू पिळणे व अर्धा तास ठेवणे. त्यानंतर ते चेहऱ्याला लावणे. आठवड्यातून एकदा करणे. त्वचा गोल्डन रंगाची होते.

१६) तुळशीच्या पानांचा रस रात्री लावला व सकाळी धुतला तर ब्यूटिपार्लरमध्ये जायची गरज नाही. मेकअप करायची गरज नाही. चेहऱ्यावरील सर्व काळे डाग निघून जातात.

१७) पोटाच्या आजारावर- वावडिंग चमचाभर वाटीभर पाण्यात रात्री भिजत घालणे. सकाळी उठल्यावर कडक पाण्यात उकळवून गाळून चमच्याने देणे.

१८) कानाच्या पडद्याला छिद्र- उसाचे कांडे घेणे, त्याला जाळात टाकून गरम करायचे व चमचाभर रस घेणे व एक थेंब मध टाकायचे. वस्त्रगाळ करणे व कानात टाकायचे, कापूस लावायचा.

१९) हाता-पायाला घाम येणे- सुपारीचे एक खांड सकाळ- सायंकाळ असे १५ दिवस खाणे.

२०) लहान मुलांची छाती भरते, सर्दी झाली तर- अर्धा चमचा मोहरी घेऊन चेचायची व एक थेंब मध घालायचा, त्याचा फक्त एक मिनीट बाळाला वास द्यायचा.

२१) तुरटीच्या पाण्यात सलग ८ दिवस अंघोळ (३ महिन्यांतून एकदा असे वर्षातून ४ वेळा ) केले तर हाता-पायाला खाज येणार नाही. खरूज, नायटा गजकर्ण होणार नाही.

# जांभूळ खाण्याचे फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उन्हाळा आणि पावसाळा अशा दोन्ही ऋतूंत येणारे हे फळ दिसायला लहान असते. जांभळात अनेक औषधी गुणधर्म असतात. यात जांभळ्या रंगाच्या बेरी असतात. याची चव गोड, तुरट असते. इंग्रजी भाषेत जांभळाला ब्लॅक बेरी असेही म्हणतात.

जांभळात सोडियम, मॅग्नेशियम, लोह, कॅल्शियम, व्हिटॅमिन-सी आणि व्हिटॅमिन-बी सारखे पोषक घटक असतात. यातील व्हिटॅमिन-ए डोळ्यांचे आरोग्य चांगले राखते, तसेच व्हिटॅमिन-सी त्वचा ताजी आणि चमकदार करते. जांभळात पोटॅशियम असते. यामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहतो. यामुळे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. जांभळाच्या पानात बॅक्टेरिया विरोधी गुणधर्म असतात. जांभळाच्या बिया, पाने आणि साल यांचा वापर मधुमेह उपचारात केला जातो. वाढता ताण, हार्मोनल असंतुलन आणि जंकफूडचे सेवन यामुळे पिंपल्सचा त्रास होतो. जांभळाचा रस पिंपल्स कमी करण्यासाठी वापरला जातो. जांभूळ किंवा त्याच्या पानांचा रस त्वचेवर लावल्याने तेल आणि सेबमचा स्राव कमी होण्यास मदत होते. यामुळे पिंपल्सच्या समस्येत आराम मिळतो. जांभूळचा वापर शरीराला बाहेरून आणि अंतर्गत दोन्ही प्रकारे शुद्ध करण्यासाठी केला जाऊ शकतो. जांभळाची साल हे रक्त शुद्ध करणारी आहे, रक्त आतून स्वच्छ करते आणि त्वचेची बाहेरून काळजी घेते. रक्त शुद्ध असेल तर चयापचय चांगले राहते आणि त्वचा सुंदर दिसते. डोळ्यात जळजळ आणि वेदना होणे यासाठी जांभळाच्या पानांचा उपयोग होतो. ४०० मि.ली. पाण्यात जांभळाची १५-२० पाने शिजवा. याचा पाव भाग शिल्लक राहिला, की थंड करून डोळे धुवा. डोळ्यांच्या समस्यांवर याचा फायदा होतो.

कानाच्या समस्या यावर जांभूळ उपयोगी आहे. काही वेळा जखमेवर किंवा इतर कारणांमुळे कानातून पस किंवा पाणी येणे सुरू होते. यासाठी जांभूळ बारीक करून मधात मिसळून खावे. एक उत्कृष्ट आयुर्वेदिक औषध असून १-२ थेंब कानात टाकल्याने कान वाहणे, कान दुखणे इत्यादी समस्या थांबू शकतात.

दातदुखीवर जांभूळ फायदेशीर ठरतो. यासाठी जांभळाची पाने जाळून त्याची राख करावी. ती पेस्टप्रमाणे दात आणि हिरड्यांवर घासल्याने दात आणि हिरड्या मजबूत होतात. इतकेच नव्हे, तर जांभळाच्या पिकलेल्या फळांचा रस काढून गार्गल करा. असे केल्याने पायरिया बरा होतो.



पोट गरम करणे, आहार वाढविणे यामुळे अनेकदा लोकांना तोंडात फोड येण्याची समस्या निर्माण होते. जांभळाच्या पानांच्या रसाने तोंडाच्या अल्सरमध्ये आराम मिळतो. याच्या तुरट प्रभावामुळे अल्सरमुळे होणारा लालसरपणा आणि वेदना कमी होतात. यासोबतच घशातील वेदना आणि घशाच्या इतर समस्याही दूर होतात. जांभूळच्या १० ते १५ मि.ली. रसाचे नियमित सेवन केल्यास घशाच्या समस्या पासून आराम मिळतो. याशिवाय घसादुखीसाठी जांभूळच्या झाडाची साल १-२ ग्रॅम चूर्ण घ्या. ही पावडर आयुर्वेदिक दुकानात मिळेल. या पावडरचे मधासोबत सेवन केल्यास फायदा होतो. आमांश हा रक्तरंजित मल पोटाचा विकार आहे. यापासून आराम मिळविण्यासाठी जांभळाच्या सालीचा रस काढून तो प्या. यामुळे आमांशापासून आराम मिळतो. याशिवाय जांभळाच्या झाडाची १० ग्रॅम साल ५०० मि.ली. पाण्यात शिजवून घ्यावी. एक चतुर्थांश शिल्लक असताना प्या. यामुळे आमांशातही आराम मिळतो. हे दिवसातून २ ते ३ वेळा २०-३० मि.ली. प्रमाणात घ्यावा. पोटाशी संबंधित समस्या दूर होतात. मूळव्याध असल्यास जांभळाच्या फुलांच्या २० मि.ली. रसात थोडी साखर मिसळा. हे दिवसातून तीन वेळा प्यायल्याने मूळव्याधातील रक्तस्त्राव थांबतो. यासोबतच १० ग्रॅम जांभळाची पाने २५० मि.ली. गाईच्या दुधात मिसळून प्यायल्याने ही समस्या दूर होते. हे सलग सात दिवस दिवसातून तीन वेळा प्यायल्याने मूळव्याध रक्तस्त्राव थांबतो.

किडनी स्टोनसाठी जांभूळ फायदेशीर ठरतो. पिकलेले जांभूळ खाल्ल्याने हे स्टोन विरघळतात, असे म्हटले जाते. यासोबत जांभळाच्या १० मि.ली. रसात थोडेसे मीठाचे खडे टाका. दिवसांतून २-३ वेळा प्यायल्याने मूत्रमार्गात अडकलेले खडे फुटण्याची आणि लघवी सोबत बाहेर येण्याची शक्यता असते. जांभळामध्ये हायपोग्लाइसेमिक गुणधर्म आहेत. त्याचे नियमित सेवन रक्तातील साखर ३० टक्के कमी होते. जांभळाच्या बियांमध्ये अल्कलॉइड असतात जे रक्तातील साखर कमी करण्यास मदत करतात. जांभूळ कर्नल पावडर सेवन केल्याने मधुमेहाच्या समस्येपासून आराम मिळतो आणि रक्तातील साखर कमी होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# लसूण आरोग्यासाठी चांगला आहे का?

## जाणून घ्या त्याचा इतिहास आणि फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लसूण हा स्वयंपाकासाठी घराघरात वापरला जातो. मात्र, त्याचा वापर काही अलीकडच्याच काळातील नाही. हजारो वर्षांपासून लसूण वापरला जात आहे. लसूण खरोखर आरोग्यासाठी चांगला आहे का ? जाणुन घेऊयात त्याचा इतिहास आणि फायदे.

लसूणचा वापर फक्त उग्र किंवा वेगळ्या चवीसाठी केला जातो असे नाही. तर औषधी गुणधर्मांसाठीदेखील तो वापरला जातो. लसूण हा त्याच्या अँटीमायक्रोबियल आणि अँटीव्हायरल वैशिष्ट्यांसाठी ओळखला जातो. स्वयंपाकघरात आणि पारंपरिक उपायांमध्ये तो दीर्घकाळापासून एक प्रमुख घटक आहे. लसूण तसा मूळचा मध्य आशियातील आहे. स्थलांतरित लोकांबरोबर तो युरोप आणि अगदी अमेरिकेपर्यंतही पोहोचला आहे. सध्या जगात लसणाचे सर्वाधिक उत्पादन चीनमध्ये होते. एका कार्यक्रमात लसणाचा समृद्ध इतिहास, त्याचे सांस्कृतिक महत्त्व यांचा शोध घेण्यात आला. लसूण हा असंख्य पाककृतींमधील एक अतिशय महत्त्वाचा आवश्यक घटक आहे. डॅनिश शेफ पॉल एरिक जेन्सन यांचे वायव्य फ्रान्समध्ये एक फ्रेंच डायनिंग स्कूल आहे. त्यांच्याकडे शिकायला अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युके आणि आशिया खंडातून विद्यार्थी येतात. पॉल म्हणतात, की लसूण माहिती नसलेला एकही विद्यार्थी अजून त्यांना भेटलेला नाही. पॉल म्हणतात, की लसणामुळे अन्नाची चव नाट्यमयरित्या वाढते. लसणाचा वापर नसलेल्या फ्रेंच पाककृतींची ते कल्पनाही करू शकत नाहीत. लसणाशिवाय फ्रेंच लोक चवदार पदार्थाची कल्पना करू शकतात, असे मला वाटत नाही. अगदी चिकन किंवा मटणाच्या सूपपासून ते साध्या सूपपर्यंत, भाज्यांमध्ये किंवा मांसाहारी पदार्थांमध्ये लसणाची एखादी तरी पाकळी नक्कीच असते. लसणाचा वापर न करता पदार्थ तयार करणं हे कल्पनेपलीकडचे आहे. मात्र, १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला ते जेव्हा



डेन्मार्कच्या ग्रामीण भागात होते, तेव्हा त्यांना लसूण जवळपास माहीतच नव्हता. तीव्र वासामुळे तो तेव्हा कुप्रसिद्धच होता असे ते सांगतात. मात्र, नंतरच्या काळात तुर्कियेमधील कामगार डेन्मार्कला स्थलांतरित होऊ लागले. ते त्यांच्या अन्नपदार्थांमध्ये नेहमीच लसणाचा वापर करत होते. त्यातून तिथे लसूण परिचयाचा होत गेला. शेफ पॉल जेन्सन यांना इटालियन पिझ्झामधून लसणाची सवय झाली. आज हिवाळ्यातील एक औषधी घटक म्हणून देखील ते लसणाचा वापर करतात. " मी आणि माझी जोडीदार सकाळी एक कप ब्रॉथ घेतो. प्रत्येक कपात लसणाची एक पाकळी टाकलेली असते. आम्हाला सर्दी किंवा फ्लूचा त्रास होत नाही. मला खात्री आहे की, ते लसणामुळे असेल, " असेही ते सांगतात. ब्रॉथ म्हणजे मटण किंवा चिकन आणि विविध भाज्या टाकून तयार केलेले एकप्रकारचे सूप असते.

### लसणाचा प्रदीर्घ प्रवास

लसणाचे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक महत्त्व हजारो वर्ष जुने आहे. प्राचीन ग्रीक लोक चौकाचौकात लसूण ठेवत होते. हेकेट या देवतेला ते तो लसूण अर्पण करत होते. हेकेट ही जादूटोणा आणि घरांचे रक्षण करणारी देवता आहे. तर इजिप्तमध्ये प्रसिद्ध फारोह तुतनखामेनच्या खडग्यात लसूण सापडला होता. मृत्यूनंतरच्या जगात त्याचे रक्षण करण्यासाठी तो ठेवण्यात आलेला होता. चीनमधील आणि फिलिपिनो लोककथांमध्ये व्हॅम्पायरशी लढण्यासाठी लोकांनी लसणाचा वापर केल्याच्या कथा आहेत. रॉबिन चेरी 'गार्लिक: ॲन एडिबल बायोग्राफी' या पुस्तकाच्या त्या लेखिका आहेत. त्या म्हणतात, "लसणाचा वापर करून तयार करण्यात आलेला जगातील सर्वात प्राचीन पदार्थ किंवा पाककृती मेसोपोटेमियन स्टू ची आहे. यात मांस आणि इतर भाज्या एकत्र करून शिजवल्या जातात. ती जवळपास ३ हजार ५०० वर्षे जुनी आहे. त्यात लसणाच्या दोन पाकळ्यांचा वापर करण्यात आलेला आहे." "औषधी घटक म्हणून लसणाचा वापर केल्याचा सर्वात जुना संदर्भ जवळपास ३ हजार ५०० वर्षांपूर्वीचा आहे. त्याला एबर्स पॅपिरस असे म्हणत होते. त्यात अस्वस्थता ते परजीवी आणि हृदयाचे आजार ते श्वसनाच्या आजारांपर्यंत सर्व काही बरे करण्यासाठी लसणाचा वापर कसा करावा याचे उल्लेख करण्यात आलेले आहेत," असे त्या म्हणतात. रॉबिन चेरी म्हणतात, की प्राचीन ग्रीक वैद्य आणि तत्वज्ञ हिप्पोक्रेट्स यांनी लसणाचा वापर विविध वैद्यकीय उपचारांमध्ये केला होता. याशिवाय अरिस्टॉटल आणि अरिस्टोफान्ससारख्या प्रमुख विचारवंत आणि लेखकांनी देखील लसणाच्या औषधी गुणधर्मांचा उल्लेख केला आहे.

# एका लिटर इंधनात ट्रेन, विमाने आणि हेलिकॉप्टर किती अंतर प्रवास करतात ?

**ग्लोबल महातेज अमळनेर**

जेव्हा- जेव्हा आपण बाईक किंवा कार खरेदी करण्याचा विचार करतो तेव्हा आपण प्रथम त्याच्या वैशिष्ट्यांसह त्याचे मायलेज पाहतो. पेट्रोल किंवा डिझेल
याचा अर्थ असा, की एक लिटर पेट्रोल किंवा डिझेलवर वाहन किती अंतर प्रवास करू शकते. साधारणपणे, कारने प्रवास करायचा खर्च थेट इंधनावर अवलंबुन असतो. रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांप्रमाणे आकाशात उडणारी विमाने, हेलिकॉप्टर आणि ट्रेन एका लिटर इंधनात किती अंतर कापतात, हेही जाणून घेणे महत्वाचे आहे.

**बोईंग ७४७**

विमानांबद्दल बोलायचे झाले तर, बोईंग ७४७ चा सरासरी वेग ताशी सुमारे ९०० किलोमीटर आहे. ते अंदाजे ५०० प्रवासी वाहून नेऊ शकते. एका अहवालानुसार एक बोईंग विमान प्रति सेकंद सुमारे चार लिटर इंधन वापरते. म्हणजेच ते एका मिनिटात अंदाजे २४० लिटर इंधन वापरते. एक 'बोईंग ७४७' प्रति लिटर इंधनात अंदाजे ८ किलोमीटर प्रवास करू शकते. एका तासात, हे विमान अंदाजे १४ हजार ४०० लिटर इंधन वापरते.

**ट्रेन**

साधारणपणे १२ डब्यांच्या प्रवासी ट्रेनला १ किलोमीटर अंतर कापण्यासाठी अंदाजे ६ लिटर डिझेल लागते. १२ डब्यांच्या एक्सप्रेस ट्रेनला एक किलोमीटर अंतर कापण्यासाठी अंदाजे ४. ५ लिटर डिझेल लागते. १ लिटर डिझेल इंधनामुळे प्रवासी ट्रेन १६ किलोमीटर (अंदाजे १६० मीटर) आणि एक्सप्रेस ट्रेन २ किलोमीटर (अंदाजे २०० मीटर) अंतर कापू शकते. सुपरफास्ट ट्रेन १ लिटर डिझेलवर अंदाजे २३० मीटर प्रवास करू शकतात. ज्याप्रमाणे कारचे मायलेज वेगवेगळ्या मॉडेल्सनुसार बदलते तसे ट्रेनचेही आहे. प्रत्येक ट्रेनचे मायलेज डब्यांच्या संख्येनुसार, वेगानुसार आणि ती वाहून नेणाऱ्या मालानुसार बदलते. स्थिर वेगाने प्रवासी ट्रेन वारंवार थांबल्यामुळे सामान्यतः कमी मायलेज देतात. दुसरीकडे, सुपरफास्ट ट्रेनचे मायलेज जास्त असते. त्याचे कारण म्हणजे त्या कमी वेळा थांबतात आणि स्थिर वेगाने प्रवास करतात.




**हेलिकॉप्टर**

हेलिकॉप्टर हे पेट्रोल किंवा डिझेलने चालत नाहीत, तर एव्हिएशन टर्बाइन इंधन किंवा एव्हिएशन केरोसिन नावाच्या एका विशेष प्रकारच्या इंधनाने चालतात. हे इंधन पेट्रोलियमपासून मिळवलेले डिस्टिलेट द्रव आहे. भारतात एव्हिएशन टर्बाइन इंधनाची किंमत प्रति किलोलिटर अंदाजे १ लाख ५ हजार ते १ लाख २० हजार असते. एक हेलिकॉप्टर सामान्यतः प्रति तास ५० ते ६० लिटर इंधन वापरते. परिणामी एक हेलिकॉप्टर १ लिटर इंधनावर तीन ते चार किलोमीटर उड्डाण करू शकते.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# कोपरगावचा नरभक्षक बिबट्या ठार

**पान १ वरून**

दि. ५ नोव्हेंबर रोजी नंदिनी प्रेमदास चव्हाण या तीन वर्षीय चिमुरडीवर बिबट्याने हल्ला करुन तिचा बळी घेतला होता. या घटनेला आठवडाही उलटत नाही तोवर सोमवार दि, १० नोव्हेंबर रोजी शांताबाई अहिलू निकोले (वय ६०, येसगाव) यांच्यावर पुन्हा हल्ला झाला होता. त्यात त्यांचा जागेवरच मृत्यू झाला होता. सोमवारी सकाळी साडेदहा वाजेला शांताबाई त्यांच्या घरासमोरील शेतात जनावरांसाठी गवत कापत होत्या. यावेळी कापसाच्या पिकात दडून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घालुन त्यांना ओढत नेले. त्यांच्या किंकाळ्या ऐकून वस्तीवरील नागरिक धावत आले. लोकांचा आढोळा पाहताच बिबट्या पळून गेला. मात्र, तोपर्यंत शांताबाईंचा जागीच मृत्यू झाला होता.

**४० जणांची टीम, रात्रीचे सर्च ऑपरेशन**

नंदिनीच्या मृत्यूनंतर वनविभागाने विशेष मोहीम सुरू केली होती. कोपरगाव, राहुरी आणि संगमनेर विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मिळून तब्बल ४० जणांचे पथक सलग आठवडाभर कार्यरत होते. ड्रोन, पिंजरे, सापळे, रात्रीचे गस्त पथक असे विविध उपाय वापरले जात होते. अखेर शनिवारी रात्री टाकळी शिवारात दिसलेल्या बिबट्यावर शुटरांनी गोळीबार केला.

तालुक्यात उक्कडगाव, चांदे कासारे, मुर्शदपूर, देरडे चांदवड, खेरडी, गणेश दुल्हनबाई वस्ती परिसर, शहरानजीक असलेला चांदगव्हाण, अंबिका नगर परिसर, संवत्सर, शिंगणापूर रेल्वे स्टेशन परिसर, रामवाडी, गंगा-गोदावरी नदीकाठ या भागात अजूनही बिबट्यांचे दर्शन होत असल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे शेतकरी आणि कामगार शेतात जाण्यास टाळाटाळ करीत आहेत. पेरू, मोसंबी, केळी, पपई बागांचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे. विद्यार्थी एकटे शाळेत जाण्यास घाबरत आहेत. वस्ती व गावातील रात्रीची ये-जा बंद झाली आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अद्यापही कायम आहे.

## 'ही' पीके घ्या! अन् खात्यात मिळवा ५० हजार...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यशासनाने शेतकऱ्यांसाठी एका नव्या उपक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत शेतकऱ्यांना ५० हजार रुपये मिळणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या स्पर्धेतंर्गत ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवसाचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला ५० हजार रुपये मिळणार आहेत.उत्पादन कर्त्या प्रथम येणाऱ्या शेतकऱ्याला ही रक्कम देण्यात येणार आहे.

यास्पर्धेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्याला एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येईल.



# छत्रपती शिवाजी महाराजांनी घराणेशाही कशी मोडीत काढली?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुराज्य निर्माण करताना घराणेशाहीला कधीच महत्त्व दिले नाही. ती अतिशय नियोजनबद्ध आणि तितक्याच विश्वासार्हतेतून मोडीत काढली. त्यासाठी नेमके काय केले? हे जाणून घेऊया.

**तत्त्व :** शिवाजी महाराजांनी घराणेशाहीला कधीच प्रोत्साहन दिले नाही. सेवा नेहमी गुणवत्तेनुसार व निष्ठेनुसार दिली.

**नियम :** सरनोबतीच्या वेळी एखाद्या हवालदाराचा मृत्यू झाल्यास त्याची जागा त्याच्या नातेवाईकांना लगेच देऊ नये, हा स्पष्ट आदेश होता.

**दक्षता :** घोडदळातील सरदाराने सुचविलेला व्यक्ती योग्य असेलच असे नाही. त्यामुळे त्याला गडावर सेवा लगेच देण्यास मनाई होती.

**सुरक्षा :** शत्रूला गडावर प्रवेश मिळू नये, यासाठी ओळखीच्या माध्यमातून भरती करण्यास मर्यादा होत्या.

**धोका :** जास्त नातेवाईक एकाच गडावर असले तर बंड किंवा फितुरीची शक्यता वाढत असल्याचे महाराजांना जाणवत होते.

**नियोजन :** व्यवस्थापनासाठी मात्र जेथे मनुष्यबळाची कमतरता असेल तेथे योग्य अनुभव असलेल्या नातेवाईकांना सेवा दिली जात असे.

**उदाहरण :** पुरंदरचे किल्लेदार महादजी निळकंठराव सरनाईक यांच्या मृत्यूनंतर त्यांचा चार मुलांमध्ये किल्लेदारपदावरून वाद झाला.

**हस्तक्षेप :** शिवाजी महाराजांनी हा वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणाच्याही मनात ऐकण्याची तयारी नव्हती.

**निर्णय :** भविष्यातील धोका टाळण्यासाठी महाराजांनी चौघा सरनाईक बंधूंना कैद केले.

**ताबा :** पुरंदर किल्ला महाराजांनी आपल्या ताब्यात घेतला. तेथे नवीन किल्लेदार नेमला.

**नेमणूक :** पुरंदर किल्ल्यावर नेताजी पालकर यांना किल्लेदार म्हणून नेमले.

**सन्मान :** महादजींच्या मुलांना मात्र त्यांचा पूर्वीचा दर्जा व जमिनींचा हिस्सा देऊन न्याय दिला.

**उन्नती :** पुढे नेताजी पालकर यांना सैन्याचा सरसेनापती या पदापर्यंत पदोन्नती मिळाली.

**परंपरा :** प्रतापराव गुजर सरसेनापती होण्यापूर्वी राजगडचे किल्लेदार होते. मात्र त्यांच्याही नातेवाईकांना तशीच जागा देण्यात आली नाही.

**बदल :** किल्लेदाराच्या नातेवाईकांना सेवा देताना त्यांना त्या गडावर न ठेवता इतर गडावर पाठवून बंडाची शक्यता महाराजांनी रोखली.

**(संदर्भ : श्री रामचंद्रपंत अमात्य यांनी हे आज्ञापत्रात लिहिले आहे.)**

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# हिंदू धर्मातील १६ संस्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्राचीन काळी आपल्या प्रत्येक कार्याचा संस्कारानेच आरंभ होत असे. त्यावेळी संस्कारांची संख्याही जवळ-जवळ चाळीस होती. जसजसा काळ बदलत गेला आणि मानव व्यस्त होत गेला तसे काही संस्कार स्वतःच लुप्त होऊन गेले. अशा प्रकारे काळाबरोबर बदल होत होत संस्कारांची संख्या निर्धारित होत गेली. गौतम स्मृतीमध्ये चाळीस प्रकारच्या संस्कारांचा उल्लेख आहे. महर्षी अंगिरा यांनी त्यांचा अंतर्भाव पंचवीस संस्कारांत केला. व्यास स्मृतीमध्ये सोळा संस्कारांचे वर्णन झाले आहे. आपल्या धर्मशास्त्रात देखील मुख्य करून सोळा संस्कारांची व्याख्या करण्यात आलेली दिसते. या १६ संस्कारांची माहिती करून घेऊया.

## १) गर्भाधान संस्कार



आपल्या शास्त्राने मान्य केलेल्या संस्कारांत गर्भाधान पहिला आहे. गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर प्रथम कर्तव्याच्या स्वरूपात या संस्काराला मान्यता देण्यात आलेली आहे. गृहस्थ जीवनाचा प्रमुख उद्देश संतान उत्पत्ती हा आहे. उत्तम संतती होण्याची इच्छा बाळगणाऱ्या पती-पत्नींनी गर्भाधानापूर्वी आपले तन आणि मनाच्या पवित्रतेसाठी हा संस्कार केला पाहिजे. दैवी जगताने बाळाची प्रगल्भता वाढावी आणि ब्रह्मदेवाच्या सृष्टीशी ते चांगल्या प्रकारे परिचित होऊन दीर्घकाळापर्यंत धर्म आणि मर्यादा यांचे रक्षण करत या लोकात आयुष्य उपभोगेल हाच या संस्काराचा मुख्य उद्देश आहे. विवाहानंतर करण्यात येणाऱ्या विविध पूजा आणि क्रिया याचाच हिस्सा आहेत.

### गर्भाधान मुहूर्त

ज्या स्त्रीला ज्या दिवशी मासिक धर्म होईल, त्याच्या चार रात्रींच्या नंतर समान रात्री जेव्हा शुभ ग्रह केंद्र (१,४,७,१०) तथा त्रिकोण (१,५,९) मध्ये असेल, तथा पाप ग्रह (३,६,११) मध्ये असेल अशा मुहूर्तात पुरुषाला पुत्रप्राप्तीसाठी आपल्या स्त्रीशी समागम केला पाहिजे. मृगशिरा अनुराधा श्रवण रोहिणी हस्त तिन्ही उत्तरा स्वाती धनिष्ठा आणि शतभिषा या नक्षत्रांमध्ये षष्ठी वगळून अन्य तिथी आणि दिवसांत गर्भाधान केले पाहिजे. परंतु चुकून देखील शनिवार, मंगळवार आणि गुरुवारी पुत्रप्राप्तीसाठी संगम करता कामा नये.

## २) पुंसवन संस्कार



गर्भ राहिल्यानंतर भावी मातेचा आहार, आचार-विचार, व्यवहार, चिंतन-मनन, भाव या सर्वांना उत्तम आणि संतुलित ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. हिंदू धर्मामध्ये संस्कार परंपरेच्या अंतर्गत भावी माता-पित्यांना ही तथ्य समजावून दिली जातात, की शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या परिपक्व झाल्यानंतर समाजाला श्रेष्ठ आणि तेजस्वी अशी नवीन पिढी देण्याच्या संकल्पासोबतच संतानाला जन्म देण्याचा प्रपंच करावा. त्याकरिता अनुकूल असे वातावरणही निर्माण केले जाते. गर्भाच्या तिसऱ्या महिन्यात विधिवत पुंसवन संस्कार संपन्न करण्यात येतो. कारण या वेळेपर्यंत गर्भातील बाळाच्या विचार तंत्राचा विकास सुरू होत असतो. वेद मंत्र, यज्ञाचे वातावरण आणि संस्कार सूत्र यांच्या प्रेरणेमुळे बाळाच्या मनावर श्रेष्ठ असा प्रभाव तर पडतोच. परंतु भाविक आणि परिजन यांना देखील प्रेरणा मिळते की भावी मातेसाठी श्रेष्ठ मनःस्थिती आणि परिस्थिती कशी विकसित केली जाऊ शकते.

### क्रिया आणि भावना

गर्भपूजनासाठी गर्भार महिलेच्या परिवारातील सर्व वयस्क आणि परिजनांच्या हातात अक्षता, फुले देण्यात यावीत. मंत्र म्हणावेत. मंत्र समाप्त झाल्यानंतर एका बशीत एकत्र करून गर्भार महिलेला देण्यात यावे. तिने त्याचा पोटाला स्पर्श करावा आणि ठेवून द्यावे. यावेळी अशी भावना करावी, की गर्भातील बाळाला सद्भाव आणि अनुग्रहाचा लाभ देण्यासाठी हे पूजन करण्यात येत आहे. गर्भार महिला त्याचा स्वीकार करून गर्भाला त्याचा लाभ होण्यात सहयोग करत आहे. ॐ सुपर्णोऽसि गरुत्माँस्त्रिवृत्ते शिरो, गायत्रं चक्षुबृहद्रथन्तरे पक्षौ । स्तोमऽआत्मा छन्दा स्यङ्गानि यजूषि नाम । साम ते तनूर्वामदेव्यं, यज्ञायज्ञियं पुच्छं धिष्ण्याः शफाः । सुपर्णोऽसि गरुत्मान् दिवं गच्छ स्वःपत॥

## ३) सीमन्तोन्नयन संस्कार



सीमन्तोन्नयन यालाच सीमंत संस्कार असे देखील म्हणतात. सीमन्तोन्नयन याचाच अर्थ सौभाग्य संपन्न होणे. गर्भपात रोखण्याबरोबरच गर्भातील शिशू आणि त्याची माता यांचे संरक्षण करणे हा देखील या संस्काराचा मुख्य उद्देश आहे. या संस्काराच्या माध्यमातून गर्भार स्त्रीचे मन प्रसन्न ठेवण्यासाठी सवाष्ण (सौभाग्यवती) स्त्रिया गर्भार स्त्रीला कुंकू लावतात. हा संस्कार गर्भधारणेच्या सहाव्या किंवा आठव्या महिन्यात करण्यात येतो.

## ४) जातकर्म संस्कार



नवजात बालकाची नाळ कापण्यापूर्वी हा संस्कार करण्याची प्रथा आहे. या दैवी जगताशी प्रत्यक्ष संपर्कात येणाऱ्या बालकाला मेधा, बल आणि दीर्घायू यांसाठी सुवर्णखंडाने मध आणि तूप गुरुमंत्राच्या उच्चारांसोबत चाटवण्यात येते. दोन थेंब तुपाचे आणि सहा थेंब मधाचे मिश्रण करून अभिमंत्रित करून चाटवल्याच्या नंतर पिता बालकाच्या बुद्धिमान, बलवान, निरोगी आणि दीर्घायुषी होण्यासाठी प्रार्थना करतो. यानंतर माता बाळाला स्तनपान करवते.

## ५) नामकरण संस्कार



बाळाच्या जन्मानंतर होणारा पहिला संस्कार म्हणजे नामकरण विधी असे म्हणता येऊ शकते. खरे म्हणजे जन्मानंतर लगेचच जातकर्म संस्कार करण्याचे विधान आहे, परंतु वर्तमान परिस्थितीत ते व्यवहारात आणलेले दिसत नाही. आपल्या पद्धतीत त्याचे तत्व देखील नामकरण विधीत समाविष्ट केलेले आहे. या संस्काराच्या माध्यमातून शिशु रुपात अवतरलेल्या जीवात्म्याला कल्याणकारी यज्ञाच्या वातावरणाचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येतो. त्या जीवाजवळ पूर्वीच्या संस्कार संचायापैकी जे हीन आहेत, त्यांच्यापासून मुक्त करणे आणि जे श्रेष्ठ आहेत त्यांचे आभार मानाने अभिष्ट असते. नामकरण संस्काराच्या वेळी बालकाच्या अंतरात मौलिक कल्याणकारी प्रवृत्ती आणि आकांक्षा यांची स्थापना, जागरणाच्या सूत्रांचा विचार करत त्यांच्या अनुरूप असे वातावरण तयार झाले पाहिजे. बालक मुलगा आहे की मुलगी, या भेदभावाला तिथे जागा असता कामा नये. भारतीय संस्कृतीत कोठेही अशा प्रकारचा भेद नाहीये. शीलवती कन्येला दहा पुत्रांच्या समान मानले गेले आहे. 'दश पुत्र-समा कन्या यस्य शीलवती सुता.' याच्या विरुद्ध पुत्र देखील कुल धर्म नष्ट करणारा असू शकतो. 'जिमि कपूत के ऊपजे कुल सद्धर्म नसाहि.'

त्यामुळेच मुलगा किंवा मुलगी कोणीही असो, त्याच्या अंतरातील वाईट संस्कारांचे निवारण करून श्रेष्ठत्वाच्या दिशेला त्याचा प्रवाह निर्माण करण्याच्या दृष्टीने नामकरण संस्कार केला गेला पाहिजे. हा संस्कार केला जात असताना बाळाचे आप्त, हितचिंतक आणि उपस्थित व्यक्ती यांच्या मनात बाळाला जन्म देण्या व्यतिरिक्त त्यांना श्रेष्ठ व्यक्तित्व संपन्न बनवण्यासाठीचे महत्त्व निर्माण होते. भाव भरलेल्या वातावरणात प्राप्त सूत्र कार्यान्वित करण्याचा उत्साह जागतो. सामान्यतः हा संस्कार जन्मापासून दहाव्या दिवशी केला जातो. त्याच दिवशी सुवेराचे निवारण आणि शुद्धीकरण देखील केले जाते. जर प्रसूती घरातच झाली असेल तर त्या कक्षाला झाडून, धुवून-पुसून स्वच्छ केले पाहिजे. बाळ आणि त्याची माता दोघांनाही स्नान करवून स्वच्छ वस्त्र घातली जातात. या सर्वांसोबातच यज्ञ आणि संस्काराचा क्रम वातावरणात दिव्यता मिसळून अभिष्ट उद्देशाची पूर्तता करतो. जर काही कारणामुळे दहाव्या दिवशी नामकरण संस्कार करता आला नाही, तर नंतर एखाद्या दिवशी हा संस्कार संपन्न केला पाहिजे. घर, प्रज्ञा संस्थाने अथवा यज्ञ स्थळे या ठिकाणी देखील हा संस्कार करून घेणे योग्य आहे.

## ६) निस्क्रमन संस्कार



निष्क्रमण याचा अर्थ आहे बाहेर काढणे. या संस्कारात बाळाला सूर्य तसेच चंद्राची ज्योती दाखवण्याची प्रथा आहे. भगवान भास्कराचे तेज आणि चंद्राची शीतलता यांच्याशी बाळाची ओळख करून देणे हाच यामागचा उद्देश आहे. यामागे बाळाला तेजस्वी आणि विनम्र बनवण्याची रचनाकर्त्यांची कल्पना असावी. त्या दिवशी देवी-देवतांचे दर्शन आणि त्यांच्याकडून बाळाच्या दीर्घ आणि यशस्वी जीवनासाठी आशीर्वाद ग्रहण केला जातो. जन्माच्या चौथ्या महिन्यात हा संस्कार करण्याची प्रथा आहे. पहिल्या तीन महिन्यांपर्यंत बाळाचे शरीर बाह्य वातावरण, कडक ऊन, वारा इत्यादींसाठी अनुकूल नसते, त्यामुळे पहिले तीन महिने काळजीपूर्वक त्याला घरातच ठेवले पाहिजे. त्यानंतर हळूहळू त्याला बाह्य वातावरणाच्या संपर्कात आणले पाहिजे. या संस्काराचा हेतू हाच की बालक समाजाच्या संपर्कात येऊन त्याला सामाजिक परिस्थितीचे ज्ञान होईल.

## ७) अन्नप्राशन संस्कार



बाळाला जेव्हा पेय पदार्थ, दूध यांच्या व्यतिरिक्त अन्न देण्यास प्रारंभ केला जातो, तेव्हा हा शुभारंभ यज्ञीय वातावरणात आणि धार्मिक स्वरुपात करण्यात येतो. या प्रक्रियेलाच अन्नप्राशन संस्कार असे म्हणतात. बाळाला दात येणे म्हणजे त्याला पेय व्यतिरिक्त खाद्य पदार्थ देता येण्याच्या पत्रातेचा संकेत आहे. त्याप्रमाणे हा संस्कार सहाव्या महिन्याच्या जवळपास करण्यात येतो. अन्नाचा शरीराशी अगदी जवळचा संबंध आहे. मनुष्य आणि प्राणी यांचा बहुतेकसा वेळ आहार व्यवस्थेतच जातो. त्याचे योग्य ते महत्त्व ओळखून त्याला सुसंस्कार युक्त बनवून घेण्याचा प्रयत्न करणे योग्यच आहे.

अन्नप्राशन संस्कारात देखील असेच होते. चांगली सुरुवात म्हणजेच अर्धी सफलता. तेव्हा बाळाच्या अन्नाहाराच्या क्रमाला श्रेष्ठात श्रेष्ठ संस्कारयुक्त वातावरणात करणेच अभिष्ट आहे. आपली परंपरा अशीच अही की भोजनाचे ताट समोर येताच अगोदर त्यातील मुंगी, पक्षी, कुत्रा इत्यादींचा भाग बाजूला काढून आहुती देण्यात येते. भोजन ईश्वराला मनोमन अर्पण करून किंवा अग्नीत आहुती देवून मगच ग्रहण केले जाते. होळीचे पर्व तर याच प्रयोजनासाठी आहे. नवीन पिकापैकी एकही दाणा मुखात घेण्या अगोदर आधी त्याची आहुती होलिका यज्ञात देण्यात येते. तेव्हाच ते खाण्याचा अधिकार प्राप्त होतो. शेतकरी जेव्हा कापणी, झोडपणी वगैरे उरकून धान्याची राशी तयार करतो, तेव्हा आधी त्यातील एक टोपलीभर धान्य धर्म कार्यासाठी बाहेर काढून मगच उरलेले धान्य घरी घेऊन जातो. त्यागाच्या संस्कारासोबत अन्नाचा प्रयोग करण्याच्या दृष्टीनेच धर्मघट-अन्नघट ठेवण्याची प्रथा प्रचलित आहे. भोजनाच्या पूर्वी बलिवैश्व देव प्रक्रिया देखील अन्नाला यज्ञीय संस्कार देण्यासाठी करण्यात येते.

## ८) मुंडन चुडाकर्म जावळ संस्कार



या संस्कारात बाळाचे केस पहिल्यांदाच कापण्यात येतात. प्रचलित रूढी अशी आहे की हा संस्कार बाळ 1 वर्षाचे होईपर्यंत करण्यात यावा किंवा मग थेट तिसऱ्या वर्षात करावा. हा समारंभ अशासाठी महत्त्वाचा आहे की बाळाच्या मेंदूचा विकार आणि सुरक्षा यांच्यावर यावेळी विशेष विचार केला जातो आणि हा कार्यक्रम शिशु पोषणात संमिलीत केला जातो, ज्यामुळे त्याचा मानसिक विकास योग्य रीतीने चालू होईल. चौर्याऐंशी लक्ष योनीतून भ्रमण करत राहिल्याने मनुष्य कित्येक असे पाशवी संस्कार आणि विचार आपल्या अंतरात ग्रहण करून असतो, जे मानवी जीवनात निरुपयोगी आणि लांच्छनास्पद असतात. त्यांना घालवून आणि त्यांच्या जागी मानवतावादी आदर्शांची प्रतिष्ठापना करण्यासाठी केले जाणारे कार्य एवढे महान आणि आवश्यक आहे की जर ते होऊ शकले नाही तर असेच म्हणावे लागेल की शरीर तर मनुष्याचे आहे, मात्र प्रवृत्ती तर पशुचीच बनून राहिली आहे. आपली परंपरा हेच शिकवते की केसांमध्ये स्मृती सुरक्षित राहतात, आणि जन्मतः आलेल्या केसंसोबत असलेल्या पूर्व जन्मातील स्मृती पुसून टाकण्यासाठी हा संस्कार करण्यात येतो.

## ९) विद्यारंभ संस्कार



जेव्हा बालक किंवा बालिका यांचे वय शिक्षण घेण्यायोग्य होते, तेव्हा त्याचा / तिचा विद्यारंभ संस्कार केला जातो. यामध्ये समारंभाच्या माध्यमातून जिथे एकीकडे बाळामध्ये अभ्यासाचा उत्साह निर्माण केला जातो, तिथेच पालक आणि शिक्षक यांना देखील त्यांच्या या पवित्र आणि महान दायित्वाच्या बाबतीत जागरूक केले जाते, की बाळाकडून अक्षर ज्ञान, विषयांचे ज्ञान यांच्या सोबतच जीवनाच्या श्रेष्ठ मूल्यांचा देखील बोध आणि अभ्यास करून घेत राहावा.

## १०) कर्णवेध कानटोचणे



आपल्या मुनींनी देखील सर्व संस्कार वैज्ञानिक कसोटींत खरे उतरल्या नंतरच त्यांचा प्रारंभ केला आहे. कर्णवेध संस्काराचा आधार पूर्णपणे वैज्ञानिक आहे. बाळाचे शारीरिक व्याधींपासून संरक्षण व्हावे हाच यामागचा हेतू आहे. प्रकृतीदत्त या शरीराची सर्व अंग महत्त्वपूर्ण आहेत. कान आपले श्रवण द्वार आहेत. कान टोचल्याने व्याधी दूर होतात तसेच ऐकण्याची शक्ती देखील वाढते. याच्या सोबतच कानांत दागिने घालणे हा आपल्या सौंदर्य दृष्टीचा परिचयच आहे. यज्ञोपवीत (मुंज) संस्काराच्या आधी हा संस्कार करण्याचे विधान आहे. प्रत्यक्षात आपल्याकडे बाळ अगदी लहान असतानाच त्याचे कान टोचून घेतले जातात. ज्योतिष शास्त्रानुसार शुक्ल पक्षातील शुभ मुहूर्तावर या संस्काराचे संयोजन उत्तम आहे.

## ११) यज्ञोपवीत संस्कार



यज्ञोपवीत (संस्कृत संधी विच्छेद= यज्ञ+उपवीत) शब्दाचे दोन अर्थ आहेत. उपनयन संस्कार ज्यामध्ये जानवे घातले जाते. मुंडन आणि पवित्र पाण्याचे स्नान हे देखील या संस्काराचे भाग आहेत. सुतापासून बनलेले तीन धाग्यांचे हे पवित्र बंधन यज्ञोपवीतधारक व्यक्ती डाव्या खांद्याच्या वरून आणि उजव्या काखेच्या खाली असे तिरके परिधान करते. यज्ञाद्वारे संस्कार केले गेलेले उपवीत, यज्ञसूत्र.

यज्ञोपवीत एका विशिष्ट धाग्याला विशेष विधींनी गाठ बांधून करून तयार केले जाते. यामध्ये सात गाठी मारण्यात येतात. ब्राम्हणाच्या जानव्यात ब्राम्हगाठ असते. तीन धागे असलेले हे जानवे गुरुंनी दीक्षा दिल्यानंतर कायम धारण केले जाते. हे तीन धागे हिंदू त्रिमूर्ती ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचे प्रतिक आहेत. अपवित्र झाल्यानंतर जानवे बदलले जाते. जानवे धारण केल्याशिवाय अन्न आणि पाणी ग्रहण केले जात नाही. यज्ञोपवीत धारण करण्याचा मंत्र आहे – **यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् । आयुष्यमग्रं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ।।**

## १२) वेदारंभ संस्कार



हा संस्कार ज्ञानार्जानाशी संबंधित आहे. वेद याचा अर्थ आहे ज्ञान. आणि वेदारम्भाच्या माध्यमातून बाळाने आता ज्ञानार्जनाला सुरुवात करावी असा या संस्काराचा अभिप्राय आहे. शास्त्रांत ज्ञाना इतका दुसरा कोणताही प्रकाश मान्य केलेला नाही. स्पष्ट आहे की प्राचीन काळी या संस्काराला मानवी जीवनात विशेष महत्त्व असणार. मुंज झाल्यानंतर बालकांना वेदांचे अध्ययन आणि विशिष्ट ज्ञान प्राप्त करण्यासाठी योग्य आचार्यांजवळ गुरुकुलात पाठवण्यात येई. वेदारंभ संस्काराच्या आधी आचार्य आपल्या शिष्यांकडून ब्रम्हचर्य व्रताचे पालन आणि संयमित जीवन जगण्याची प्रतिज्ञा करून घेत असत. आणि त्याची परीक्षा घेतल्यानंतरच वेदाध्ययन करून घेत असत. असंयमित जीवन जगणारे वेदांच्या अध्ययनाला योग्य समजले जात नसत. आपले चारही वेद ज्ञानाचे अखंड भांडार आहेत.

## १३) केशान्त संस्कार



गुरुकुलात वेदाध्ययन पूर्ण केल्यानंतर आचार्यांच्या समक्ष हा संस्कार संपन्न केला जात असे. प्रत्यक्षात हा संस्कार गुरुकुलातून निरोप घेणे आणि गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याचा उपक्रम आहे. वेद – पुराण आणि विविध विषयांत पारंगत झाल्यानंतर ब्राम्हचाऱ्याच्या समावर्तन संस्काराच्या आधी केसांची सफाई केली जात असे आणि त्याला स्नान करवून स्नातक उपाधी दिली जात असे. केशान्त संस्कार शुभ मुहूर्तावर केला जात असे.

## १४) समावर्तन संस्कार



गुरुकुलातून निरोप देण्याच्या आधी शिष्याचा समावर्तन संस्कार होत असे. या संस्काराच्या आधी शिष्याचा केशान्त संस्कार होत असे आणि मग त्याला स्नान घालण्यात येत असे. हे स्नान समावर्तन संस्काराच्या अंतर्गत होत असे. यामध्ये सुगंधी पदार्थ आणि औषधीयुक्त पाण्याने भरलेले वेदीच्या उत्तर भागात आठ घटांच्या पाण्याने स्नान करण्याचे विधान आहे. हे स्नान विशेष मंत्रांच्या उच्चारासोबत होत असे. यानंतर शिष्य पट्टा (मेखला) आणि दंड सोडून देत असे जे यज्ञोपवितासोबत धारण केलेले असत. या संस्कारानंतर त्याला आचार्य विद्या स्नातकाची पदवी देत असत. या उपाधी बरोबर तो सगर्व गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यासाठी योग्य समाजाला जात असे. यावेळी तो सुंदर वस्त्र आणि आभूषणे धारण करत असे आणि आचार्य आणि गुरुजनांचे आशीर्वाद घेऊन आपल्या घरी जाण्यासाठी निरोप घेत असे.

## १५) विवाह संस्कार



हिंदू धर्मामध्ये परिवार निर्माणाची योग्यता अंगी आल्यावर, मानसिक परिपक्वता आल्यावर युवक युवतींचा विवाह संस्कार करण्यात येतो. भारतीय संस्कृतीनुसार विवाह म्हणजे काही केवळ शारीरिक किंवा मानसिक अनुबंधन नाहीये, तर इथे दाम्पत्याला एक श्रेष्ठ अध्यात्मिक साधनेचे स्वरूप दिलेले आहे. म्हणूनच म्हटलेले आहे – 'धन्यो गृहस्थाश्रमः'
सद्गृहस्थच समाजाला अनुकूल व्यवस्था, आणि विकासात सहाय्यक होण्या सोबतच श्रेष्ठ नवीन पिढी बनवण्याचे देखील कार्य करतात. तेच आपल्या साधनांनी ब्रम्हचर्य, वानप्रस्थ आणि संन्यासी आश्रमाच्या साधकांना वंचित सहयोग देत राहतात. असे सद्गृहस्थ तयार होण्यासाठी विवाहाला रूढी आणि वाईट चालीरिती यांच्यापासून मुक्त करून एका श्रेष्ठ संस्काराच्या स्वरुपात पुनः प्रतिष्ठित करणे आवश्यक आहे. युग निर्माणाच्या अंतर्गत विवाह संस्काराचे पारिवारिक आणि सामूहिक प्रयोग सफल आणि उपयुक्त सिद्ध झाले आहेत.

## १६) अन्त्येष्टी श्राद्ध संस्कार



हिंदू धर्मात कोणाचा मृत्यू झाल्यास त्याचे मृत शरीर वेदोक्त पद्धतीने चितेवर दहन करण्याची प्रक्रिया अंत्येष्ट विधी किंवा अंत्यसंस्कार म्हणून ओळखली जाते. हिंदू मान्यतेनुसार हा सोळा संस्कारातील एक संस्कार आहे.

हिंदू धर्मानुसार प्रत्येक शुभ कार्याच्या प्रारंभी माता – पिता, पूर्वज यांना नमस्कार करणे आपले कर्तव्य आहे. आपल्या पूर्वजांच्या वंश परंपरेमुळे आज आपण हे जीवन बघू शकत आहोत. या जीवनाचा आनंद उपभोगत आहोत. या धर्मात ऋषींनी वर्षातील एका पंधरवड्याला पितृ पक्ष किंवा पितृ-पंधरवडा असे नाव दिले, ज्या पंधरवड्यात आपण आपल्या पितरांचे श्राद्ध, तर्पण, मुक्ती हेतूने विशेष क्रिया संपन्न करून त्यांना अर्घ्य देतो. जर काही कारणाने त्यांच्या आत्म्याला मुक्ती मिळाली नसेल तर आपण त्यांच्या शांतीसाठी विशिष्ट कर्म करतो.

